**<u>अधिकार अभिलेख</u>**

**भूसंपादन केलेल्या जमिनी आणि वक्फ जमिनी यांच्याबाबतीत गा. न.नं.७/१२ च्या इतर हक्क सदरी तसेच गा.न.नं.१ (क) मध्ये घ्यावयाच्या नोंदी संदर्भात क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना पुरक दिशानिर्देश देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः जमीन- २०२१/प्र.क्र.१०/ज-१ अ**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक: - १५ मार्च, २०२१.**

**<u>वाचा -</u>**

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रं.लोआप्र-२००९/प्र.क्र.२३८/ल-६, दिनांक १७ मार्च,२०१२

२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.वक्फ-२०१५/प्र.क्र.७८/ज-१अ, दिनांक १३ एप्रिल,२०१६

३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण/०१/२०१७/प्र.क्र.११/अ-२, दिनांक ११ जानेवारी,२०१८

४) महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका खंड-४ भाग (दोन) यांमधील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती

५) महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१.

६) जमाबंदी आयुक्त कार्यालयाचे पत्र क्रमांक क्र.रा.भू.४/इतर हक्कातील नोंदी/२०२०, दिनांक २८/१२/२०२०.

**<u>प्रस्तावना</u> -**

महाराष्ट्र जमीन महसूल नियमपुस्तिका (खंड चार) मधील भाग (दोन) महाराष्ट्र राज्यातील ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन पध्दती या विषयी आहे. त्यानुसार ग्राम पातळीवरील महसुली लेखांकन करण्याकरीता, विविध नोंदवह्यांचा गाव नमुना व दुय्यम नोंदवह्या यांचे नमुने विहीत करण्यात आलेले असुन त्याचा गोषवारा देखील देण्यात आलेला आहे.

या विभागाचा शासन निर्णय क्र. लोआप्र-२००९/प्र.क्र.२३८/ल-६, दि. १७/०३/२०१२ अन्वये गाव नमुना १(क) मध्ये सुधारणा केली असून, भोगवटदार वर्ग-२ सत्ता प्रकाराच्या तसेच निर्बंधित सत्ता प्रकारच्या जमिनीची वर्गवारी १ ते १४ या प्रकारामध्ये निश्चित करुन दिली आहे व त्याप्रमाणेच सुविधा ई-फेरफार प्रणालीमध्ये विकसित करण्यात आली आहे.

तसेच या विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण/०१/२०१७/प्र.क्र.११/अ-२, दिनांक ११ जानेवारी,२०१८ अन्वये भूसंपादन करून प्रदान केलेल्या जमीनीचे वापरात बदलाचे सर्वंकष धोरण निश्चित केले आहे. त्याच्या अनुषंगाने **"भूसंपादन अधिनियमान्वये संपादित वापर आणि हस्तांतरणावर निर्बंध"** असा शेरा गा.न.नं. ७/१२ च्या इतर हक्कात दर्शविण्यासाठी तसेच याकरीता निर्बंधित सत्ताप्रकाराचा नविन स्वतंत्र प्रकार गाव न.नं.१ (क) मध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. यास्तव,



Scanned with OKEN Scanner

भूसंपादन केलेल्या जमिनीचा स्वतंत्र प्रकार नमुद करुन गाव नमुना नं.१(क) च्या निर्बंधित सत्ताप्रकारांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्याबाबत व त्या अनुषंगाने **"भूसंपादन अधिनियमान्वये संपादित वापर आणि हस्तांतरणावर निर्बंध"** असा शेरा गा.न.नं. ७/१२ च्या इतर हक्कात दर्शविण्यासाठी संगणकीकरण प्रणाली (ई-फेरफार प्रणाली) मध्ये सुधारणा करण्याबाबत सर्व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

तसेच, शासन निर्णय क्र.वक्फ-२०१५/प्र.क्र.७८/ज-१अ,दिनांक १३ एप्रिल,२०१६अन्वये, वक्फ अधिनियम १९९५ अन्वये अधिसूचित वक्फ मिळकतीच्या गा.न.नं. ७/१२ वर कब्जेदार सदरी वक्फ संस्थेचे नाव आणि गा.न.नं. ७/१२ च्या इतर हक्क सदरी **"वक्फ प्रतिबंधीत सत्ता प्रकार"** अशी नोंद घेण्याबाबतचे निर्देश आहेत. तथापि वक्फ संस्थेच्या या मिळकतीची भूधारणा निर्बंधित सत्ताप्रकारांचा एक स्वतंत्र प्रकार गा.न.नं.१ (क) च्या यादीमध्ये समाविष्ट करण्याबाबत सर्व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक</u> -**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१ मधील तरतूदीन्वये प्राप्त अधिकारानुसार, सर्व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना याद्वारे पुढीलप्रमाणे दिशानिर्देश देण्यात येत आहेत:-

(१) अधिकार अभिलेख विषयक गाव नमुना नं.१ (क) मध्ये घ्यावयाच्या नोंदीच्या संदर्भातील प्रकार शासन निर्णय क्र. लोआप्र-२००९/प्र.क्र.२३८/ल-६, दिनांक १७/०३/२०१२ मध्ये नमूद केले आहेत. त्या जमिनींच्या प्रकारांच्या मध्ये अ.क्र.१५ येथे **"भूसंपादन अधिनियमान्वये संपादित केलेल्या जमिनी"** तर अ.क्र.१६ येथे **"वक्फ जमिनी"** हा प्रकार या आदेशाव्दारे समाविष्ट करण्यात येत आहे. तसेच शासन निर्णय, दिनांक १७/०३/२०१२ अन्वये सुधारीत गा.न.नं.१(क) मध्येच वेगवेगळे भाग करुन या भागांमध्ये निर्बंधित सत्ताप्रकाराच्या जमिनीची सदर शासन निर्णयात विशद केलेल्या वर्गवारीप्रमाणे नोंद घेण्याचे निर्देश आहेत, त्यानुसार या जमिनींची देखील खालील दिलेल्या वर्गवारीप्रमाणे नोंद घेण्यात यावी.

| अ.क्र. | जमिनीचा प्रकार | १(क)मधील नोंद घेण्यासाठी प्रस्तावित सदर/भाग क्रमांक |
|---|---|---|
| १५ | भूसंपादन अधिनियमान्वये संपादित केलेल्या जमिनी | **१(क)१५** |
| १६ | वक्फ जमिनी | **१(क)१६** |

(२) अधिकार अभिलेख विषयक गाव न.नं.७/१२ च्या इतर हक्क सदरी भूसंपादन केलेल्या जमिनीच्या संदर्भात **"भूसंपादन अधिनियमान्वये संपादित वापर आणि हस्तांतरणावर निर्बंध"** अशी नोंद घेण्यात यावी. तसेच वक्फ जमिनीच्या संदर्भात शासन निर्णय क्रमांक वक्फ-२०१५/प्र.क्र.७८/ज-१अ, दिनांक १३ एप्रिल,२०१६ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार भोगवटादार सदरी **"वक्फ संस्थेचे नाव"** आणि इतर हक्क सदरी **"वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार"** अशी नोंद घेण्यात यावी.



Scanned with OKEN Scanner

(३) उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने अधिकार अभिलेखात नोंदी घेण्याकरीता संगणकीकरण प्रणाली (ई-फेरफार प्रणाली) यामध्ये संबंधितांनी आवश्यक त्या सुधारणा कराव्यात.

**०२.** सर्व जिल्हाधिकारी व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांनी या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी करावी.

**०३.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३१५१५२९५४५६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(रमेश चव्हाण)**
**सह सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री याचे अपर मुख्यसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
४) मा.विरोधी पक्षनेता (विधान सभा/ विधान परिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई-४०० ०३२,
५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२,
७) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२,
८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञयेता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१,) मुंबई,
९) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर,
१०) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२,
११) प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंब ई-३२.
१२) सर्व विभागीय आयुक्त,
१३) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४) सर्व जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी,
१५) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२,
१६) सर्व सह सचिव /उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१७) "ज" समूहातील सर्व कायासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१८) निवडनस्ती, कार्यासन-ज-१ अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.

****



Scanned with OKEN Scanner